# <u>लघुवाद न्यायालय, मुंबई</u>

लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, काळबादेवी, मुंबई – ४०० ००२
दूरध्वनी क्रमांक: ०२२–२२०८८७००/२२०८८७४९
Website - http://ecourt.gov.in/small-cause
Email - scc-mumbai@bhc.gov.in

## —: निविदा सुचना :—

या न्यायालयात स्टील रॅक व स्टील कपाट खरेदीसाठी मान्यवर संस्था / पुरवठा धारकांकडून खालील वैशिष्टयांप्रमाणे वाहतूक खर्च व करांसहित किंमतीच्या मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

निविदाधारकाने आपल्या निविदा मोहोरबंद करून लखोटयात भरून "मा. प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, धोबी तलाव, मुंबई – ४०० ००२" यांच्याकडे दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२३ रोजी सायंकाळी ५:०० किंवा त्यापूर्वी पोहचतील अशा पध्दतीने पाठवाव्यात. लिफाफ्याच्या वरील बाजूस **"स्टील रॅक आणि स्टील कपाटे खरेदीसाठीची निविदा"** असे स्पष्ट लिहावे. विहीत दिनांक व वेळेनंतर आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. **वस्तुंचा प्रकार व माहीती खालीलप्रमाणे :—**

**१. स्टील रॅक :—**

| अ. क्रं. | वस्तुंचा प्रकार | वस्तुची माहीती | संख्या |
|---|---|---|---|
| १. | प्रकार | तीन बाजूंनी बंद | ५५ |
| २. | शेल्फ चे कप्पे | ६ ( वरील भाग वगळून) | |
| | १. शेल्फ चे अवरूप साहित्य | १.२ मिमी जाड एमएस शीट व्याससायिक गुणवत्तेशी सुसंगत सीआर–१ आयएस ५१३ च्या ग्रेड ३४० | |
| | २. शेल्फ चे अवरूप आणि मागे (किमान) शीटची जाडी मीमी मध्ये | १.२ मीमी | |
| | ३. बाजू, मागील आणि विभाजन भिंतीची जाडी | एमएस शीट १.२ मीमी | |
| | ४. बाजू, मागील आणि विभाजन कोन जाडी (किमान)(मिमी) | ३ मिमी जाडीच्या स्आील शीटपासून बनविलेले ४० X ४० मिमीच्या | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | १.खोलीत मिमी (+५मिमी) मध्ये | ४६० मीमी | |
| | २.रूंदी मिमी (+५मिमी) मध्ये | ९२० मीमी | |
| | ३.उंची मिमी (+५मिमी) मध्ये | २१३५ मीमी | |
| | ४. ग्राउंड क्लीयरन्स (+२मिमी) | ७५ मीमी | |
| ४. | पेंट | पावडर कोटेड | |
| ५. | वस्तुच्या हमीचा कालावधी | २ वर्षे | |
| ६. | रंग | राखाडी | |
| ७. | समावेश | रबर कॅप्ससह तळाशी | |

## २. स्टील कपाटे :—

| अ. कं. | वस्तुंचा प्रकार | वस्तुची माहीती | संख्या |
|---|---|---|---|
| २. | | क) तीनही बाजुंनी बंद<br>ख) २ दरवाजे<br>ग) पाच लहान कप्पे (सोबत जोडलेल्या माहीती प्रमाणे)<br>घ) उंची ७८", लांबी ३६", खोली १९", जमिनीपासून ची उंची ६"<br>ड) रंग — राखाडी<br>च) पत्र्याची जाडी बाहेरून २२ गेज, पत्र्याची जाडी दरवाजा व आतील बाजुस २० गेज<br>छ) पत्र्याचा दर्जा — CRCA Steel Metal<br>ज) वस्तुच्या हमीचा कालावधी — २ वर्षे<br>झ) तळाशी रबर कॅप्ससह | २५ |

सदर खरेदी संदर्भातील अंतिम निर्णय व अधिकार मा. मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय यांना असतील.

लघुवाद न्यायालय, मुंबई }
}
} (आर. के. हजारे)
दिनांक : २५ सप्टेंबर, २०२३ } अप्पर प्रबंधक

# Court of Small Causes, Mumbai

Lokmanya Tilak Marg, Dhobi Talao, Kalbadevi, Mumbai – 400 002
Telephone No. 022-22088700 / 22088749
Website - http://ecourt.gov.in/small-cause
Email - scc-mumbai@bhc.gov.in

## -: TENDER NOTICE :-

The Sealed Quotations are invited for reputed Vendors/Service Providers for purchase of Steel Racks and Steel Cupboard inclusive Taxes and Transportation charges for the use of this Court, as per Specification given below.

The Quotations should be in sealed envelop addressed to the "Registrar, Court of Small Causes, L.T. Marg, Dhobi Talao, Mumbai – 400 002". On top of the envelop **"Tender Notice for purchase of Steel Racks and Steel Cupboard "** be mentioned and should reach in this Office on or before 7th October, 2023 before 5.00 p.m. The Tenders received after due date and time will not be considered.

## Product Specifications :-

### 1. STEEL RACK :-

| SR. NO. | PRODUCT TYPE | | SPECIFICATION | Quantity |
|---|---|---|---|---|
| 1. | Type | | Closed From Sides and Back | 55 |
| 2. | Number of Shelves/Compartments | | 6 ( Excluding Top ) | |
| | 1. | Shelves Materials | 1.2 mm Thick MS Sheet Conforming to Commercial Quality CR-1, Grade 340 of IS 513 | |
| | 2. | Sheet Thickness of Shelves and Back (Minimum) in mm | 1.2 mm | |
| | 3. | Sides, Back and Partition Wall Thickness | MS Sheet 1.2 mm | |
| | 4. | Angle posts material and Size ( Minimum)(mm) with slotted angles | Made from Steel Sheet of 3 mm Thickness 40 X 40 mm | |
| 3. | 1. | Depth in mm (±5mm) | 460 mm | |
| | 2. | Width in mm (±5mm) | 920 mm | |
| | 3. | Height in mm (±5mm) | 2135 mm | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 4. | Ground Clearance in mm (±2 mm) | 75 mm | |
| 4 | Paint | | Powder Coated | |
| 5. | Warantee Period in Numbers of Years | | 2 Years | |
| 6. | Colour | | Gray | |
| 7. | Including | | Bottom with Rubber Cap's | |

## 2. STEEL CUPBOARDS :-

| SR. NO. | PRODUCT TYPE | SPECIFICATION | QUANTITY |
|---|---|---|---|
| 2. | Office steel cupboard closed from sides and back, 2 doors with five small shelves | a) Closed From Sides and Back<br>b) 2 Door<br>c) Five small shelves (As per the chart)<br>d) Hight 78", Width 36", Depth 19" Ground Clearance 6"<br>e) Color – Ash Grey<br>f) Sheet Thickness Body – 22 Gauge Door & Shelves 20 – Guage<br>g) Material – CRCA steel metal<br>i) Warantee Period in Numbers of Years – 2 Years<br>j) Bottom with Rubber Cap's | 25 |

The Hon'ble Chief Judge of this Court reserves the right to accept or reject the Tender being a Final Authority.

Court of Small Causes, Mumbai }
}
}
Date :- 25 September, 2023 }

(R. K. Hajare)
Additional Registrar

<u>लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग,</u>

<u>धोबी तलाव, काळबादेवी रोड, मुंबई — ४०० ००२</u>

# दरपत्रक सुचना

दिनांक : २५ सप्टेंबर, २०२३

**मुख्य कार्यालयात व वांद्रे शाखेत स्टील रॅक व स्टील कपाट खरेदी करण्यासाठी जाहीर दरपत्रके सादर करण्यासंदर्भातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे :**

| | |
|---|---|
| १. | इच्छुक संस्था/कंपन्यानी आपले दरपत्रक विहित नमुन्यात व वस्तुंच्या पुर्ण माहितीसह मोहरबंद लखोटयात सादर करून त्या लखोटयाच्या वरच्या भागावर मोठया अक्षरात "स्टील रॅक आणि स्टील कपाटे खरेदीसाठीचे दरपत्रक" असे लिहून ते 'प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४००००२' यांच्याकडे दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२३ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहोचतील अशा पध्दतीने पाठवावे. तद्नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. |
| २. | सुक्ष्म व लघु, मध्यम उद्योग विकास अधिनियम—२००६ अंतर्गत उत्पादक म्हणून नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात येईल. ज्या दरपत्रकधारकांकडे सदरचे प्रमाणपत्र नसेल तर त्यांना दरपत्रक शुल्क रूपये १७००/— (विना परतावा) व सुरक्षा ठेव रक्कम रूपये ८५००/— (परतावा योग्य व्याजरहीत) या रक्कमेचे डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर देणे गरजेचे आहे. सदर डिमांड ड्राफ्ट/पे ऑर्डर हे ''प्रबंधक, लघुवाद न्यायालय, मुंबई" यांच्या नावे दयावयाचा आहे. |
| ३. | दरपत्रकधारकाने दरपत्रक भरतांना सर्व करासहीत (With G.S.T.) रक्कम नमुद करावी तसेच सर्व करांची रक्कम तपशिलवार दरपत्रकात नमुद करावी. |
| ५. | दरपत्रक धारकारने दरपत्रकावर संस्था/कंपनीचे नाव, पत्ता, दुरध्वनी क्रमांक, ईमेल आयडी नमुद करणे आवश्यक आहे. |
| ६. | दरपत्रक धारकांची निवड झाल्यानंतर त्यांच्याशी झालेल्या दरपत्रकातील दरानुसार सदरची खरेदी करण्यात येईल. सदर खरेदी ही ठरलेल्या अटी व शर्तीनुसारच होईल तसेच दरपत्रकधारकाची निवड झाल्यानंतर सात दिवसांच्या आत दरपत्रकधारकाने सदर पुरवठा करण्यात येणा—या कपाटाचा तसेच रॅकचा प्रत्येकी एक नमुना तपासणीसाठी स्वखर्चाने कार्यालयात सादर करणे |

| | |
|---|---|
| | बंधनकारक असेल. तसेच कार्यालयाच्या मागणीपत्रानंतर सदर वस्तुंचा पुरवठा २५ दिवसात झाला पाहिजे. विहीत कालावधीमध्ये वस्तुंचा पुरवठा न झाल्यास सदर संस्था/कंपनीची निविदा रद्द करण्यात येईल. तसेच निवड झालेल्या संस्था/कंपनीकडून खरेदी केलेल्या वस्तु पुरवठा झाल्यावर वस्तु सुस्थितीत आहे की नाही याची तपासणी करून सुरक्षा ठेव रक्कम १० दिवसानंतर परत करण्यात येईल. |
| ७. | वस्तुंची गुणवत्ता आणि किंमती पडताळणीचे पूर्ण अधिकार खरेदी समितीला राहतील. वस्तुची किंमत कमी असेल परंतू वस्तुची गुणवत्ता चांगली नसल्यास सदर वस्तु नाकारण्याचे अधिकार खरेदी समितीला राहतील. |
| ८. | वस्तुंचा स्वीकार करतांना जर वस्तुमध्ये काही त्रुटी म्हणजेच तुटलेले अथवा वस्तुंचा दर्जा व गुणवत्ता खराब असल्यास, त्या वस्तु परत देण्यात येतील व त्याऐवजी उत्तम दर्जाची नविन वस्तु पुरोठादारास देणे बंधनकारक राहिल. |
| ९. | दरपत्रकधारकाचे/संस्थेचे देयक पारित करण्यासाठी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे पाठविण्यात येईल व ते मंजूर झाल्यानंतरच दरपत्रकधारकाला रक्कम अदा करण्यात येईल. रक्कम अदा करण्यासाठी देयकासोबत पॅन कार्ड, आधार कार्ड, रद्द धनादेश (Cancelled Cheque) तसेच बॅकेच्या खाते पुस्तकाचे पहिले पान अथवा अदाता नोंदणी प्रमाणपत्र यांची छायांकीत प्रत देणे अनिवार्य आहे. |
| १०. | मा. मुख्य न्यायाधीश लघुवाद न्यायालय, मुंबई यांनी घेतलेले निर्णय अंतिम राहतील. |
| ११. | दरपत्रक मंजूर झालेल्या संस्थेने सदरच्या वस्तु या न्यायालयातील मुख्य कार्यालयात व वांद्रे शाखा येथे विना वाहतूक शुल्क पोच करावयाचे आहे. |
| १२. | समितीच्या बैठकीत दरपत्रकधारकांनी सदर स्टील रॅक व स्टील कपाट नमुना म्हणुन पत्र्याच्या जाडीचा तुकडा आणणे बंधनकारक राहील. |

लघुवाद न्यायालय, मुंबई }
}
मुंबई – २५ सप्टेंबर, २०२३ }

Rhazare

(आर. के. हजारे)
अप्पर प्रबंधक
लघुवाद न्यायालय, मुंबई